# राजर्षी

## विद्यार्थ्यांना आवाहन

**प्रिय विद्यार्थी, मित्र मैत्रिणींनो,**

दरवर्षीप्रमाणे **सन २०२४-२०२५** साठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विचारांचा आरसा असलेल्या **'राजर्षी'** या वार्षिक अंकाचे काम सुरू झाले आहे. यावर्षी **'शिवराज्याभिषकाची ३५० वर्षे'** हा विषय घेऊन आपण लेखन करणार आहोत.

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजा म्हणून राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी रायगड या किल्ल्यावर झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वाचा प्रसंग होता. शिवराज्याभिषेकाला चालू वर्षी ३५० वर्षे पूर्ण झाली आहेत. याचे औचित्य साधून आपल्या महाविद्यालयाच्या राजर्षी नियतकालिकाचा सदर अंक **'शिवराज्याभिषकाची ३५० वर्षे'** या विषयावर आपण तयार करणार आहोत. ज्या विद्यार्थ्यांना या अंकात लेखक म्हणून सहभागी व्हायचे आहे अशा विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या विषयांच्या अनुषंगाने लेखन करावे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिवराज्याभिषकाची ३५० वर्षे | २. | शिवराज्याभिषकाची गरज व महत्त्व |
| ३. | राज्याभिषकाची वैशिष्ट्ये | ४. | स्वराज्याचे व्यवस्थापन |
| ५. | महाराजांचे अष्टप्रधान मंडळ | ६. | छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीती |
| ७. | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार | ८. | छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन नीती |
| ९. | शिवचरित्रातून मी घेतलेला बोध | १०. | शिवशक व शिवकालीन मुद्रा |
| ११. | शिवराज्याभिषकाचा सामाजिक व राजकीय प्रभाव | १२. | रायगड किल्याचे भौगोलिक व ऐतिहासिक महत्त्व |
| १३. | शिवराज्याभिषकाच्या संदर्भातील पत्रव्यवहार | | |

**महत्त्वाची सूचना**

✓लेख लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचा लेख व फोटो अंकात छापला जाईल.

✓प्रत्येक भाषेत (मराठी, हिंदी, इंग्रजी) लेख लिहिणाऱ्या प्रथम दोन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस दिले जाईल.

✓आपला लेख हा स्वलिखित असावा. संदर्भ पुस्तकाचा वापर केल्यास लेखाच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची नावे लिहावीत.

✓शब्द मर्यादा ८०० ते १००० पर्यंत

✓स्वहस्ताक्षरात लेखन असावे. त्यासोबत एक फोटो द्यावा, लेखाच्या पहिल्या पानावर स्वतःचे पूर्ण नाव, वर्ग, मो. नं. याचा उल्लेख करावा.

✓प्रस्तुत लेख वरील विषयांच्या अनुषंगाने अवलोकन व आकलन करणारे असावे.

✓लेख जमा करण्याचा अंतिम दिनांक : ३१ डिसेंबर २०२४

**खालील प्राध्यापकांकडे आपले लेख व फोटो जमा करावा**

| वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|
| • मराठी : डॉ. दीपक गायकवाड<br>• हिंदी : डॉ. मीना ठाकूर<br>• इंग्रजी : प्रा. नयनिका वाघमारे | मराठी व हिंदी : प्रा. शुभांगी भोसले<br>इंग्रजी : प्रा. पी. एम. चव्हाण |

(डॉ. दीपक गायकवाड)
संपादक (मो. ९०४९०९७०३७)

श्री शाहू मंदिर महाविद्यालय पुणे-९

(डॉ. विलास पाटील)
प्रभारी प्राचार्य